मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्यात ग्रंथालयांचे योगदान: एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखा अंर्तगत

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयाच्या

पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी

सादर करावयाचा

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक
सदाशिव बाळासाहेब वरवटे
ग्रंथपाल
महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव
ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक
डॉ.शिवाजी नारायणराव सोनटक्के
उपप्राचार्य, ग्रंथपाल
कै. रसिका महाविद्यालय, देवणी
ता. देवणी जि.लातूर

२०१९

मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्यात ग्रंथालयांचे योगदान: एक अभ्यास

१. सारांश :

प्रस्तूत शोध प्रबंधाच्या आराखडयामध्ये मराठवाडयातील ग्रंथकाराच्या लेखन कार्यात ग्रंथालयाचे योगदान या विषयी विवेचन करण्यात येणार आहे. यामध्ये संशोधनाची थोडक्यात प्रस्तावना, विषय निवडीची भूमिका, उद्दिष्टे, प्राथमिक अनूमान इत्यादीचे थोडक्यात विश्लेषन करण्यात आले आहे. सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती व तथ्य संकलनासाठी प्रश्नावलीचा अवलंब करण्यात येणार आहे. तसेच सदरील संशोधनाचे सामाजिक दृष्टिकोणातून काय महत्व आहे हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच बरोबर थोडक्यात संशोधन प्रकरणांचा आढावा, वार्षीक नियोजन व अपेक्षित परीणामांचा देखील आढावा घेण्यात येणार आहे.

२ प्रस्तावना :

गरज ही शोधाची जननी असते या न्यायाप्रमाणे व मनुष्याच्या जिज्ञासुवृत्तीने इ.स. पुर्व ५०० ते ३०० दरम्यान लिपीशास्त्राचा उगम झाला. ९०च्या शतकात मराठी लिपीचा उगम झाला. हिंदुस्तानात वास्को—दि—गामा च्या आगमनानंतर म्हणजेच इ.स. १५६२ च्या सुमारास मुद्रणकलेचा प्रवेश झाला. त्यानंतर यंत्रनिर्मितीचा वेग व त्यांची संख्या झपाटयाने वाढत गेली.

उपभोक्त्याच्या ज्ञानवृद्धीमध्ये आवश्यक ती मदत करणे हे ग्रंथालयाचे आद्य कर्तव्य आहे. मानव हा प्रगतीशील प्राणी आहे. आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी मानवाने आज अनेक क्षेत्रात संशोधन केलेले दिसुन येते. संशोधनामुळे नवीन ज्ञान निर्माण होत असते त्यामुळे ग्रंथांची संख्या वाढते व त्याचप्रमाणे ग्रंथालय देखील वाढत आहेत. तसेच ग्रंथालयात दिल्या जाणा—या सेवा व सुविधा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा केला जाणारा उपयोग सुद्धा वाढत आहे त्यामुळे इतर क्षेत्राप्रमाणे ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातदेखील संशोधन करण्यात येउ लागले आहे. संशोधनामुळे पारंपारिक ग्रंथालयाचे स्वरुप बदलल्याचे दिसुन येते. महाविद्यालयीन व सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रकारात बदल

होत असताना दिसतो कारण ग्रंथकार आपणास आपले लेखन कार्य करत असताना विविध ग्रंथालयाच्या मदतीने आपले लेखन कार्य पूर्ण करत असतात. त्यामुळे ग्रंथकार आपले लेखन कार्य पूर्ण करत असताना ते महाविद्यालयीन व सार्वजनिक ग्रंथालयाच्या सहायाने लेखन कार्य सुरु होते. त्यासाठी त्यांच्या लेखन कार्यात योगदान किती प्रमाणात आहे. याचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासकाने मराठवाडयातील ग्रंथकाराच्या लेखन कार्यात ग्रंथालयाचे योगदान : एक अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

विषयनिवडीची भूमिका :

ग्रंथालय व माहितीशास्त्र पीएच. डी. पदवीसाठी एक शोध प्रबंध सादर करावयाचा असतो त्यासाठी अभ्यासकाने **मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्यात ग्रंथालयाचे योगदानः एक अभ्यास** हा विषय निवडला आहे. कारण कोणत्याही संशोधनाद्वारे समस्या किंवा अडचणी कशा प्रकारे सोडविता येतील तसेच कशाचीही कमतरता तसेच त्याच्या उणीवा आहेत का? त्याच्या बददल काही सुचना व शिफारशी करता येतील का हा प्रयत्न केला जात असतो.

ग्रंथकारांना आपल्या लेखन कार्यात आवश्यक माहितीचा शोध घेताना कोणत्या माहिती शोध साधनाचा उपयोग झाला ती माहिती कशा प्रकारे मिळवतात व ती माहिती मिळविण्यासाठी म्हणजे लेखन कार्य पूर्ण करण्यासाठी या महाविद्यालयीन किंवा सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान काय आहे किंवा होते हे जाणून घेणे अभ्यासकाला महत्वाचे वाटले म्हणून संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात येणार आहे.

३ : पूर्वाभ्यासाचे समालोचनः

1 तनगावर.एम, २०१०, स्वातंत्र्योत्तर मराठवाडयातील वैचारिक साहित्य स्वरूप आणि चिकित्सा : विशेष संदर्भ डॉ.जनार्दन वाघमारे.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

2 Dhond,S.2009, Marathawadtil Lekhikanchya katha vangamayacha abhyas , Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University. Aurangabad

3 Pawar, R 2014 , 2000 Nantarchi Marathwadatil Gramin Katha Ek Abhyas ,Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University. Aurangabad

4 Rubinandhini A, 2017-18 Mapping of the publication pattern in the Journal of applied and environmental microbiology 2001 -2015 a bibliometric study periyar university, Salem Tamilnadu

5 Sontakke, S.N.2013-14, Vandalism in university libraries in Maharashtra: An Analytical study, Swami Ramanand Teerth Marathawada university Nanded

6 Sonkamble k.2007,Marathawadaytil dalit kavita ek chikitaskh abhays , Dr Babasaheb Amedkar marathwada university Aurangabad .

४. **उद्दिष्टे,प्राथमिक अनुमान/गृहितके :**

४.१ उद्दिष्टे :

१. मराठवाडयातील लेखन करणा—या ग्रंथकारांच्या लेखन कार्याची माहिती घेणे.

२. मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्याचे विषयनिहाय व भाषा निहाय वर्गीकरण करून त्यांची रॅंक लिष्ट तयार करणे.

३. मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्य संदर्भात त्यांचे सहकारी,इतर ग्रंथालय आणि त्यांनी स्वत: खरेदी केलेल्या ग्रंथांचा परामर्श घेणे.

४. मराठवाडयातील ग्रंथकारांचे विविध साहित्य संम्मेलन,अधिवेशने,कार्यशाळा, चर्चासत्रातील योगदानाचा आढावा घेणे.

५. मराठवाडयातील ग्रंथकारांना मिळालेल्या विविध पुरस्कारांची माहिती जाणून घेणे.

६. मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्यातील विविध ग्रंथालयांचे योगदान जाणून घेणे.

७. मराठवाडयातील ग्रंथालयांचा ग्रंथकारांच्या लेखन कार्यावर होणा—या परिणामांचा अभ्यास करणे.

४.२ प्राथमिक अनुमान—संशोधनाची गृहीतके :

१. मराठवाडयात लेखन कार्य करणारे अनेक ग्रंथकार आहेत.

२. मराठवाडयातील ग्रंथकार विविध विषयात व भाषेत ग्रंथलेखन करतात.

३. मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखनकार्य संदर्भात त्यांचे सहकारी, इतर ग्रंथालये आणि त्यांनी स्वत: खरेदी केलेल्या साहित्याचे महत्वपूर्ण योगदान आहे.

४. मराठवाडयातील ग्रंथकारांचे विविध साहित्य संम्मेलने,अधिवेशने,कार्यशाळा, चर्चासत्रातील योगदान समाधानकारक आहे.

५. मराठवाडयातील अनेक ग्रंथकारांना विविध पुरस्कार मिळाले आहेत.

६. मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखनकार्यात ग्रंथालयाचे योगदान परिणामकारक आहे.

५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

अ) व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती मराठवाडयातील मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयाच्या लेखकांच्या लेखन कार्यातील ग्रंथालयांच्या योगदानापुरती असणार आहे.

ब) मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या कालखंडाची मर्यादा इ.स.२००९—१० ते २०१९—२० या कालखंडापुरती मर्यादित राहीलब

ग्रंथालय व्यवसायाच्या दृष्टीने गरज :

मराठवाडयातील ग्रंथकाराच्या लेखन कार्यात ग्रंथपालाची भुमिका विषयासंबंधी असल्यामुळे ग्रंथालयातील ग्रंथपाल व ग्रंथालयातील कर्मचा—यांना सदरील संशोधन प्रबंध मार्गदर्शक ठरेल. ग्रंथकाराच्या लेखन कार्यात माहिती संकलनाचे प्राथमिक व द्वितीयक साधने उपलब्ध करण्याचे सुचविलेले मार्ग ग्रंथपालांना व ग्रंथालयीन कर्मचा—यांना समजु शकेल त्याच बरोबर ग्रंथालयातील उपलब्ध माहिती साधनांचा उपयोग कसा व किती

प्रमाणात झाला याचे मुल्यमापन करण्याच्या दृष्टीकोनातून ग्रंथालयीन क्षेत्रातील व्यावसायिकांना मार्गदर्शक ठरेल.

६ संशोधन पध्दती :

व्यक्तीला एखादया वस्तूच्या, घटनेच्या बाबतीत सर्वच माहित असेल असे नाही. त्यासाठी व्यक्तीचे शोध घेण्याचे प्रयत्न अखंड चालू आहेत. ज्ञानाची वृध्दी करणे, अस्पष्ट ज्ञानाचे स्पष्टीकरण करणे आणि त्याची विद्यमान ज्ञानाचे सत्यता पडताळणे. हे संशोधनाचे उद्‌देश आहेत. मानव हा बुध्दीजीवी व जिज्ञासू वृत्तीचा प्राणी असल्यामुळे तो नवीन ज्ञानाच्या शोधात असतो. संशोधनाकरीता गृहित कृत्याचे परीक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्‌देशाने कोणत्यातरी संशोधन पध्दतीचा उपयोग करणे हा संशोधनाचा अर्थ आहे.

सदरील संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार असून मुलाखत व प्रश्नावलीचा अवलंब केला जाणार आहे.

अ) वर्णनात्मक संशोधन पध्दती :

वर्णनात्मक संशोधन पध्दती ही सर्व पध्दतीमध्ये अत्यंत लोकप्रिय पध्दती असून या पध्दतीचा मोठया प्रमाणावर उपयोग केलेला दिसून येतो. जास्तीत जास्त ग्रंथालयीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. या पध्दतीच्या आधारे केवळ समस्या सोडविणे एवढेच उद्‌दिष्ट न ठेवता मूलभूत सिंध्दातासाठी माहिती मिळविणे, मूलभूत तत्त्व शोधणे हे देखील उद्‌दिष्टे ठेवली जातात. याप्रमाणेच या पध्दतीचे आणखी एक वैशिष्टे म्हणजे या प्रकारात प्रयोज्य ज्या स्थितीत आहे, घटक ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीतच त्या प्रयोज्याचा घटकाचा विचार अभ्यास केला जातो. या स्थितीमध्ये बदल केला जात नाही.

वर्णनात्मक संशोधनात समस्येच्या संदर्भात, माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, कसोटया, निरिक्षण वगैरे अनेक साधनांचा उपयोग करता येतो. माहती कोणत्या

प्रकारची हवी आहे व प्रतिसादक दर्जा कसा आहे, यावर कोणते साधन वापरायचे हे ठरवावे लागते.

ब) मुलाखत :

मुलाखत हा एक मौखिक प्रकार आहे. संबंधित व्यक्तीशी प्रत्यक्ष संभाषण अथवा गप्पा गोष्टी करून संशोधन विषयासंबंधी तथ्य संकलित करण्याच्या क्रियेस मुलाखत असे म्हणतात. या पध्दतीचा विचारांचे ठराविक प्रश्न निवडून उपभोक्त्यांना त्या प्रमाणे विचारण्यात येतात किंवा वेळेवर उपभोक्त्यांच्या स्वभावानुसार प्रश्न विचारले जातात. उपभोक्त्यांना अशा प्रकारे मुलाखत घेऊन प्रश्नाव्दारे माहिती मिळविणे ही एक महत्त्वपूर्ण पध्दती आहे. त्या पध्दतीचा महत्त्वाचा फायदा असा की उपभोक्त्याच्या प्रकारानुसार कमी जास्त सोईनुसार प्रश्न विचारले जावू शकतात. त्यामुळे मिळणारे उत्तर ही बोलके आणि वास्तववादी अशा प्रकारचे असते.

क) प्रश्नावली :

प्रश्नावली हे तथ्य संकलनाचे महत्त्वाचे साधन आहे. Field Study मध्ये प्रश्नावली महत्त्वाचे कार्य करते. संशोधनाचे क्षेत्र मोठे असल्यास प्रश्नावलीचा उपयोग होतो. त्यावेळी निरीक्षण, मुलाखत या तंत्राची उणिव प्रश्नावली भरून काढते. प्रश्नावली पोस्टाने पाठविली जाते व तथ्य संकलनास त्याची मदत होते. संशोधन क्षेत्र विशाल असले तरी प्रश्नावलीच्या सहायाने आवश्यक तथ्य घरी बसून प्राप्त करता येतात. प्रश्नावलीच्या माध्यमातून अप्रत्यक्ष संपर्क साधता येतो.

माहिती संकलनाची साधने :

सदरील संशोधनात प्रामुख्याने प्रश्नावली या साधनांचा वापर माहिती संकलनासाठी करण्यात येणार आहे.

माहिती संकलनाची तंत्रे :

पाहणी, प्रत्यक्ष निरिक्षण व सामुदायिक रेकॉर्ड इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

६. सामाजिक दृष्टिकोणातून संशोधनाचे महत्व:

- **आंतरराष्ट्रीय दर्जा :** आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणातून हा संशोधन प्रबंध महत्वाचा आहे. कारण या संशोधनातील निष्कर्ष जागतीक पातळीवर परिणाम करणारे ठरू शकतात. ग्रंथकार त्यांच्या लेखन कार्यात ग्रंथालय व इतर साधन सामुग्रीवर अवलंबून असल्याने त्यांची उपयुक्तता महत्वाची ठरते.
- **राष्ट्रीय दर्जा :** राष्ट्रीय दृष्टिकोणातून हा संशोधन प्रबंध महत्वाचा आहे. मराठवाडयातील ग्रंथकारांची माहिती व त्यांचे लेखनकार्याविषयी राष्ट्रीय पातळीवर माहिती होईल.
- **विभागीय दर्जा :** हा संशोधन प्रबंध ग्रंथपालांना उपयूक्त ठरणार आहे कारण मराठवाडा पातळीवर संशोधनाच्या निष्कर्षाचा प्रचार व प्रसार करून विभागातील सर्व ग्रंथालयामध्ये संबंधीत लेखनकार्य व त्यांचे प्रकाशित झालेले ग्रंथ महाविद्यालयीन ग्रंथालयास उपयुक्त ठरतील.

७. प्रकरणांचा आराखडा:

प्रस्तूत संशोधन करीत आसताना या विषयावर पाच प्रकरणे करण्यात येणार आहेत. पहिले दोन प्रकरणातील माहीती ही सैंध्दांतीक स्वरूपाची असणार आहे. तिसरे व चौथे प्रकरणात सर्वेक्षण, तथ्य संकलन करण्यात येणार आहेत. पाचवे प्रकरणामध्ये निष्कर्ष व शिफारशी देण्यात येणार आहेत.

प्रकरण : १ : प्रस्तावना

प्रकरण : २ : पूर्वाभ्यासाचे समालोचन

प्रकरण : ३ : मराठवाडयातील ग्रंथकारांच्या लेखन कार्यात ग्रंथालयाचे योगदान: एक सिंहावलोकन

प्रकरण : ४ : माहिती संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण

प्रकरण : ५ : समापन

५.१. निष्कर्ष ५.२. शिफारशी ५.३. पूढील संशोधनास दिशा

८. संशोधन कार्याचे नियोजन:

अ.क्र	संशोधन कार्याचा तपशिल	कालावधी
१	पूर्वसाहित्याचा आढावा घेणे,संशोधनावरील पुस्तकाचे वाचन करणे	**६ महिने**
२	मराठवाडयातील ग्रंथकारांची माहिती मिळविणे	**६ महिने**
३	प्रश्नावली तयार करून मराठवाडयातील ग्रंथकारांना पाठविणे	**६ महिने**
४	संबधीत प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा करणे	**६ महिने**
५	संकलीत माहितीचे विश्लेषण करणे	**६ महिने**
६	संशोधन अहवाल तयार करून सादरीकरण करणे	**६ महिने**

संदर्भ:

१. कऱ्हाडे, बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, २००७

२ काचोळे दा.धो. सामाजीक संशोधन पध्दती,औरंगाबाद:कैलास पब्लीकेशन २००५

. ३ कर्णिक,प्रदिप संशोधन प्रकल्प स्वरूप व लेखन पध्दती,नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ २००५.

४ कुंभोजकर,ग.वि.संशोधन पध्दती व संख्याशास्त्र,कोल्हापूर :फडके प्रकाशन १९८९

५ गायकवाड,श्री.बा. संशोधन पध्दती.कोल्हापूर : स्वच्छंद प्रकाशन २०१५

६ नरगुंदे रेवती, ग्रंथालय आणि सामाजिक विकास, कोल्हापूर.२००८

७ नेमाडे, भालचंद्र. वाचन हा माणसाचा महत्वाचा अवयव. 'अनुभव'. फेब्रुवारी२०१७

८ निकोसे सत्यप्रकाश ,ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पध्दती,नागपूर: प्रज्ञा प्रकाशन पृ. क्र.९७—१०२,२००७

९ नागगोंडे, गूरूनाथ. सामाजिक संशोधन पध्दती, कोल्हापूर:फडके प्रकाशन, १९९९.

१० फडके द.ना., ग्रंथालय संगणकीकरण व आधुनिकीकरण, पुणे.२०१२

११ पवार, एस. पी., बडकत्ते, सविता, पवार, आर. जी., जाधव, सुनंदा आणि कुलकर्णी, एम. व्ही. ग्रंथालय व माहितीशास्त्र. सु.३री आ. कोल्हापूर : फडके प्रकाशन, सप्टेंबर २००९.

१२ पाटील, वा. भा. संशोधन पध्दती, नागपूर: श्री मंगेश प्रकाशन, १९९८

१३ बाहेती, एस. आर. 'महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता कार्यक्रम' 'ज्ञानगंगोत्री'. सप्टे—ऑक्टो—नोव्हे(२००६)

१४ बोधनकर सुधीर,सामाजिक संशोधन पध्दती नागपूर : श्री.साईनाथ प्रकाशन १९९३

१५ भांडारकर, पु.ल. सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, १९७६.

१६.रिसवडकर म.रा. संशोधन व्याख्या आणि पध्दती,नाशिक :य.च.म.मु. विद्यापीठ पृ. ११,२०००

१७.शिंदे, ललित मनोहरराव, मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर: एक अभ्यास: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, २००३.

१८. http://www.n-listinflibnet.ac.in.

१९. http://www.shodhgangainflibnet.ac.in

२०. http://www.srtmu.org.in

संशोधक

प्रा. सदाशिव बाळासाहेब वरवटे
ग्रंथपाल
महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव
ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक

डॉ.शिवाजी नारायणराव सोनटक्के
उपप्राचार्य, ग्रंथपाल
कै. रसिका महाविद्यालय, देवणी
ता. देवणी जि.लातूर